पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९० ■ शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com





# मनपात कमळ फुलणार...!

## महापालिका निवडणुकीत भाजप ठरला सर्वात मोठा पक्ष

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अकोला :** अकोला शहर पुन्हा एकदा भगवेमय झाले असून, महानगरपालिकेत भाजप ३६ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तसेच भाजप समर्थित एक जागा आल्याने भाजने जवळपास ५० टक्के जागा मिळविल्या आहेत. काँग्रेसनेही मुसंडी घेत २१ जागांवर आपले उमेदवार निवडून आणले आहेत. त्यामुळे सर्वत्र विजयी घोषणांनी परिसर दुमदुमला होता. वातावरण गुलालाने उजळून निघाले होते. विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून आपला आनंद व्यक्त केला. विशेष म्हणजे पक्षश्रेष्ठींही पक्षाची प्रतिष्ठा कायम राहिल्याने आवर्जून उपस्थित राहून कार्यकर्त्यांच्या जल्लोषात सहभागी झाले होते.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाने ५० वर जागा पटकावण्याचा दावा केला होता. मात्र त्यांना ५० टक्के जागांवरच समाधान मानावे लागले. त्या तुलनेत काँग्रेसच्या कोणत्या वरिष्ठ स्तरावरील नेत्यांनी प्रचारात उपस्थिती न लावताही २१ जागा जिंकून अकोला जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. प्रभाग क्र. ५, ६, १० आणि १५ मध्ये पॅनलसह भाजपने विजय प्राप्त केला तर प्रभाग क्र. ३, ४, आणि १३ मध्ये प्रत्येकी ३ उमेदवार भाजपाचे निवडून आले आहेत. या ठिकाणी प्रभाग ३ मध्ये वंचित बहुजन आघाडीचे निलेश देव यांनी भाजपाला खिंडार पाडून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

अशीच परिस्थिती प्रभाग क्र. चारमध्ये निर्माण झाली असून, यात शिवसेना उद्धव सेनेने धडक देत आपला एक उमेदवार विजयी केला आहे तर प्रभाग क्र. १३ मध्ये आशिष पवित्रकार यांनी अपक्ष राहूनही आपली ताकद सिद्ध करून दाखविली आहे. विशेष म्हणजे ते आधी भाजपचेच कार्यकर्ते होते.

### गुलालाची उधळण अन् विजयी घोषणांनी आसमंत दुमदुमला!

भाजपा ३८, काँग्रेस २१, उद्धवसेना ७, वंचित ५, शिंदेसेना २, राष्ट्रवादी अजित पवार १, राष्ट्रवादी शरद पवार १, एमआयएम ३ तर अपक्ष १

### काँग्रेसची मुसंडी

काँग्रेस पक्षाने अकोला महानगरपालिकेत २१ जागा मिळवून दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. काँग्रेसचे अस्तित्व संपल्यात जमा असलेल्यांना ही चांगली चपराक असल्याचे म्हटले जात आहे. कोणत्याही वरिष्ठ नेत्यांनी अकोल्यात हजेरी न लावताही २१ जागा मिळविल्याने जनमाणसात अजूनही काँग्रेसची ध्येयधोरण व विचारसरणी कायम असल्याचे या निकालावरून दिसून येत आहे. काहीही असले तरी काँग्रेसने मारलेली मुसंडी अनेकांना आश्चर्य चकित करणारी ठरली आहे.



### दोन्ही राष्ट्रवादीला केवळ एक-एक जागा

शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला केवळ एका-एका जागेवरच समाधान मानावे लागले. विशेष म्हणजे अकोल्यात भाजपा व राष्ट्रवादी अजित पवार यांची युती असल्यावरही त्याचा विशेष फरक पडला नाही. त्यांना आपल्या अपेक्षेप्रमाणे जागा मिळविता आल्या नाहीत.



### दिग्गज उमेदवारांना बसला हादरा

प्रभाग क्र. १२ मधून भाजपाच्या कल्पना गोटफोडे विजयी झाल्या असून, त्यांनी शिंदे सेनेच्या उषा विरक यांचा पराभव केला आहे. प्रभाग क्र. ९ मधून अजय रामटेके, प्रभाग ७ मधून सुनील मेश्राम

### एकनाथ शिंदेही पाडू शकले नाहीत प्रभाव

अकोल्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भव्य सभा झाली होती. लाडक्या बहिणींची गर्दी पाहून अकोल्याची हवा पालटेल, अशी शहरवासीयांना अपेक्षा होती. मात्र ते आपला प्रभाव मतपेटीवर पाडू शकले नाहीत, हेच आजच्या निकालावरून दिसून आले. त्यांच्या पक्षाला केवळ दोन जागांवरच समाधान मानावे लागले.

### उद्धव सेनेने राखली लाज

एकीकडे अकोल्याच्या मतदारांनी एकनाथ शिंदेंना नाकारले तर तिथेच उद्धव सेनेला ७ जागांवर निवडून आणले आहे. वास्तविक पाहता उद्धव सेनेच्या एकाही वरिष्ठ नेत्याने अकोल्यात हजेरी लावली नव्हती. तरीही शिवसेना उबाठा गटाच्या उमेदवारांनी एकहाती किल्ला लढवित सात जागांवर ताबा मिळवून पक्षाची लाज राखली आहे.

## भारतीय जनता पार्टीचाच 'मराठी' महापौर होणार!



प्रतिनिधी १६ जानेवारी

**मुंबई:** मुंबईच्या इतिहासत पहिल्यांदाच भाजपाचा मराठी महापौर होत आहे. याबद्दल कुणीही शंका बाळगण्याचे कारण नाही,' असे भाजपा प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे. ते एका मराठी वृत्तवाहीनीशी बोलत होते. मुंबईमध्ये कदाचित इतिहासात पहिल्यांदाच भाजपाचा महापौर होऊ शकतो... असे विचारले असता, त्यांनी हे भाष्य केले. उपाध्ये म्हणाले, 'ज्या पद्धतीने महापालिका निवडणुकीचे निकाल आले आहेत. यावरून कुणालाही हे कळेल की, मुंबईमध्ये भारतीय जनचा पक्षाचा उमेदवार होईल. मी सांगतोय, मराठीच महापौर. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यंचे गेल्या अेक वर्षांपासूनचे स्वप्न होते, गेल्या ४० वर्षांपासून आम्ही एक छोटा भाऊ म्हणून आमची सुरुवात झाली आणि आज आम्ही एवढ्या मोठ्या ठिकाणी आलो आहोत.



## अकोल्यात वंचितचा जलवा कायम!


प्रतिनिधी १६ जानेवारी

अकोला: प्रस्थापितांना हादरा देत वंचित बहुजन आघाडीने पुन्हा आपली ताकद सिद्ध केली आहे. प्रभाग क्र. ३ मध्ये निलेश देव निवडून येत त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. तसेच प्रभाग क्र. १४ मध्ये संपूर्ण पॅनलच निवडून आले आहे. या विजयी उमेदवारांमध्ये उज्ज्वला पातोड, जयश्री बहादूरकर, पराग गवई आणि शेख समशू कमर शेख साबीर यांचा समावेश आहे. वंचितने ५ जागा काबिज केल्या आहेत.

महापालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे निलेश देव, पराग गवई, उबाठाचे सागर भारूका यांचे विजय लक्षणीय ठरले. समाजसेवेची पावती मतदारांनी दिल्याची भावना व्यक्त झाली.

माजी नगरसेविका धनश्री देव यांच्या निधनानंतर निलेश देव यांनी समाज कार्याला वाहून घेतले. प्रभाग तीन मध्ये त्यांची लढत भारतीय जनता पक्षाचे सागर शेगोकार यांच्याशी होती. देव यांच्या साठी अंजलीताई आंबेडकर, सुजात आंबेडकर यांनी प्रचार सभा घेतल्या. तसेच वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते कामाला लागले. त्यामुळे विजय शक्य झाला. प्रभाग १२ मध्ये उबाठाचे सागर भारूका यांनी तर प्रचारा दरम्यान सामाजिक बांधिलकी दाखवली. त्यातून त्यांना यश मिळाले. तसेच, पराग गवई यांनी प्रभाग १४ क मधून दणदणीत विजय प्राप्त केला. कोविड काळात जीवावर उदार होऊन त्यांनी केलेली कामे विसरू शकत नाही. आरोग्य सेवा तर त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग झाला आहे. त्याचे फळ त्यांना मिळाले. त्यांच्या समर्थकांनी प्रचंड जल्लोष केला.





## पहिल्यांदाच महानगरपालिकेची मतमोजणी झाली सहा ठिकाणी

### सकाळपासून उमेदवार, पक्षांचे कार्यकर्ते अन नागरिकांची झुंबड गर्दी

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिकेसाठी १५ जानेवारीला मतदान झाल्यानंतर सर्वांनाच मतमोजणीची उत्सुकता लागून कोणत्या पक्षाची सत्ता येते याकडे लक्ष लागले होते. या निवडणुकीची मतमोजणी करण्यासाठी पहिल्यांदाच मनपामध्ये सहा ठिकाण निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे एकाच ठिकाणी गर्दी न होता सहा ठिकाणी ही गर्दी विभागल्या गेली होती. सर्वच पक्ष, त्यांचे उमेदवार व नागरिकांना निकालाची उत्सुकता असल्याने सकाळपासूनच त्यांनी मतमोजणीच्या ठिकाणी जमण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे



मतमोजणीच्या ठिकाणाला यात्रेचे स्वरूप आले होते.

निवडणूक निकालानंतर होणारी गर्दी व वाद लक्षात घेता यंदाच्या निवडणुकीची मतमोजणी प्रभागनिहाय करण्यात आली होती. महानगरपालिकेत सहा प्रभाग असल्याने सहा निवडणूक निर्णय अधिकारी व मतमोजणी केंद्र निश्चित करण्यात आले होते. सहा ठिकाणी मतमोजणी होणार असल्याने आकड्यांची जुळवाजुळव करताना प्रशासनासह वृत्तपत्र प्रतिनिधींसह इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या प्रतिनिधींची चांगली धावपळ होत असल्याचे दिसून आले. तसेच याचा पोलिस प्रशासनावरही अप्रत्यक्ष ताण आल्याचे चित्र शुक्रवारी दिसून आले. प्रत्येक ठिकाणी बंदोबस्त आणि पथकाद्वारे गस्त घालेण वरिष्ठ अधिकाऱ्यांना जड जात होते. मात्र असे असले तरी सर्व मतमोजणीची प्रक्रिया सुरळीत व शांततेत सुरू होती.

मतमोजणीला ११ वाजता सुरूवात झाल्यानंतर एक-एक आकडेवारी समोर येताच नागरिक एकच जल्लोष करीत होते. सुरूवातीला आघाडीवर असलेल्या उमेदवारांच्या नावाने घोषणा देत पक्षाचा जयजयकारही करीत होते.

त्यामुळे एकच जल्लोष पहावयास मिळाला. तसेच काही वॉर्डाचे निकाल घोषित होताच त्यांनी विजयी जल्लोष साजरा करीत आपल्या पक्षांच्या वरिष्ठ नेतृत्वाला व समस्त जनतेला विजयाचे श्रेय देताना उमेदवार दिसून आले. त्यामुळे सहाही ठिकाणी गुलालाची उधळण होताना दिसून आली.

### सर्वच जण घेत होते मोबाइलवरून आकडेवारीची अपडेट!

यंदा विविध ठिकाणी मतमोजणी असल्याने दुसऱ्या प्रभागातील वॉर्डामधून कोण आघाडीवर आहे किंवा कोण जिंकले याची अपडेट सर्वच जण घेताना दिसून येत होते. सर्वांच्या कानाला मोबाइल लागल्याचे चित्र मतमोजणी केंद्रावर दिसून येत होते. या वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या मतमोजणीमुळे सर्वांचीच धावपळ होताना दिसून आले. काही पक्षांचे कार्यकर्ते सारखे इकडून तिकडे फिरताना दिसून अपडेट घेत होते.

### रस्ते झाले निर्मनुष्य

आज सुटी नसूनही रस्ते निर्मनुष्य दिसत होते. सर्व गर्दी मतमोजणीच्या ठिकाणी झाल्यामुळे दुपारी दोन वाजेपर्यंत रस्त्यावरील वर्दळ मंदावल्याचे चित्र दिसून आले. जे काही कामावर गेले ते आपल्या मित्रांना मतमोजणीची काय स्थिती आहे, कोणता पक्ष आघाडीवर आहे किंवा निवडून आला याची माहिती घेताना दिसत होता. तसेच अनेक नागरिकांनी घरीच टीव्ही चॅनलवर मतमोजणीचा आनंद लुटताना दिसत होते. त्यामुळे रस्त्यावर फारशी गर्दी दिसून येत नव्हती.



सिटी न्यूज वऱ्हाड

शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# खामगावातील दुकानात चोरीप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा

**खामगाव :** शहरातील केडिया टर्निंगजवळील एका दुकानातून चोरट्यांनी सुमारे ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली होती. ही चोरीची घटना दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, या प्रकरणी दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगलम कॉम्प्लेक्स मधील सुरुची ट्रेडर्स या दुकानाचे संचालक महेश मनोहर राठी (३५) यांनी दुकान बंद करून ओंकारेश्वर-उज्जैन येथे दर्शनासाठी गेले होते. परतल्यानंतर दुकान उघडण्यासाठी आले असता शटरच्या मधल्या लॉकजवळ शटर वाकलेले दिसून आले. शटर उघडून पाहणी केली असता दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले आढळले. दुकानातून सुपारी, साबण, खोबरा तसेच १७ हजार रुपये रोख, असा एकूण ६२ हजार ९८६ रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निष्पन्न झाले. दुकानातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या दोन अज्ञातांनी चोरी केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.




समर्थ हायस्कूल येथे उद्योजक चंद्रकुमार उर्फ लप्पी भैया जाजोदिया, अनिता जाजोदिया, अंजू जाजोदिया, पवन जाजोदिया यांनी आपल्या परिवारासह मतदान केले.

# मतदान हा केवळ हक्क नाही, तर लोकशाही टिकवण्याची जवाबदारी आहे - आमदार सुलभाताई खोडके

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अमरावती:** प्रभाग क्रमांक - २ संत गाडगेबाबा - पीडीएमसी प्रभाग स्थित प्रगती विद्यालय, राधा नगर ( गाडगे नगर ) मतदान केंद्रावर आमदार . सुलभा खोडके व आमदार - संजय खोडके यांनी मतदानाचा हक्क बजावला.

ङत्मतदान हे लोकशाहीतील मूल्ये, नैतिकता आणि जवाबदारी यांची बाजू घेण्याचे साधन आहे. असा संदेश देत खोडके कुटुंबीयांनी बजावला मतदानाचा अधिकार असल्याचे ते म्हणाले. १५ जानेवारी -गुरुवार दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रभाग क्रमांक -२ संत गाडगेबाबा - पीडीएमसी प्रभाग स्थित प्रगती विद्यालय,राधा नगर ( गाडगे नगर ), अमरावती येथील मतदान केंद्रावर आमदार - संजय



विनायकराव खोडके व आमदार सुलभाताई संजय खोडके यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यासोबतच यश सुलभा संजय खोडके, डिम्पल खोडके, संयुक्ता खोडके या परिवार सदस्यांनी सुद्धा मतदानाचा हक्क बजावला. आजचे महापालिकांसाठीचे मतदान हे केवळ उमेदवार निवडण्यापुरते मर्यादित नाही, ते लोकशाहीतील मूल्ये, नैतिकता आणि जवाबदारी यांची बाजू घेणाचे साधन आहे. मतदान हा केवळ हक्क नाही, तर लोकशाही टिकवण्याची जबाबदारी आहे. लोकशाहीचे भवितव्य सुजाण, निर्भय आणि जागरूक मतदारांच्या निर्णयावरच अवलंबून आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत असतील, तरच लोकशाहीचा पाया भक्कम राहील आणि त्याची सुरुवात एका जागरूक, निर्भय मतदाराच्या निर्णयापासूनच होते. तशी सुरुवात आज झाली. या शब्दात आमदार . सुलभाताई खोडके यांनी संवाद साधित प्रत्येकाने मतदान केलेच पाहिजे. अशी भूमिका यावेळी व्यक्त केली.लोकशाही म्हणजे केवळ राज्यघटना, निवडणुका किंवा सत्ता बदलाची यंत्रणा नव्हे, लोकशाही म्हणजे सतत जागृत असलेली नागरिकांची जाणीव. या जाणीवेचा सर्वात प्रभावी, शांत आणि घटनात्मक आविष्कार म्हणजे मतदान. मतदान म्हणजे लोकशाही जपण्याचे, टिकवण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे.महानगरपालिका निवडणूक २०२५ - २६ निमित्ताने आपण सांगू इच्छितो की, मतदान केंद्रावर जाऊन आपली भूमिका नोंदवणे हे लोकशाहीला बळ देणारे कृत्य आहे. या शब्दात संवाद साधित आम्ही मतदान केले आपण सुद्धा आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, अशी भूमिका आमदार - संजय खोडके यांनी यावेळी व्यक्त केली.

# कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे विदर्भस्तरीय भव्य भजन स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी १६ जानेवारी

**दर्यापूर :** राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त दर्यापूर बाजार समितीतर्फे १२ व १३ जानेवारी रोजी विदर्भ स्तरीय भव्य खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विदर्भातील ३३ भजन मंडळानी या भजन स्पर्धेत सहभाग दर्शविला होता.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक संत बिरबलनाथ महाराज भजन मंडळ गिंभा ता. मंगरूळ जिल्हा वाशिम यांनी पटकवीला, द्वितीय क्रमांक गुरुदेव मित्र भजन मंडळ वरवट खंडेराव तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा यांनी पटकाविला, तृतीय क्रमांक गुरुदेव सेवा भजन मंडळ साखरी



अचलपूर, चतुर्थ क्रमांक माऊली गुरुदेव सेवा भजन मंडळ आमंतवाडा, पाचवा क्र. श्री गुरुदेव भजन मंडळ वस्तापूर चिखलदरा, सहावा क्र. श्री गुरुदेव भजन मंडळ कंजरा मूर्तिजापूर यांनी पटकवीला यावेळी उत्कृष्ट गायक म्हणून किशोर धुमाळे दोनोडा, उत्कृष्ट तबलावादक गौरव खातखेडे गोपालखेड, उत्कृष्ट हार्मोनियम वादक दिपक खडके बोरी, उत्कृष्ट खंजिरी वादक अजय येवतकार मागरूळ कांबे, उत्कृष्ट कोरस जागेश्वर भजन मंडळ कंजरा, शिस्तबद्ध मंडळ चंपा माता भजन मंडळ माळेगाव यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटक खासदार बळवंत वानखडे, अध्यक्ष सुधाकर भारसाकळे, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरंग पाटील अरबट,दिनकरराव गायगोले, बाजार समिती सभापती सुनील गावंडे, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार, खरेदी विक्री अध्यक्ष गजाननराव जाधव, संजय बेलोकार, प्रदीप देशमुख, बाजार समिती उपसभापती राजु कराळे , खरेदी विक्री उपाध्यक्ष प्रभाकर कोरपे, तसेच दुसऱ्या सत्रात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, कोषाध्यक्ष दिलीपराव इंगोले, कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, बाळासाहेब टोळे,विलास टाले, गजानन देशमुख,संजय कोल्हे,किशोर गणोरकर, दिनकरराव देशमुख, दिलीप गावंडे तसेच सर्व बाजार समितीचे संचालक यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन बाजार समितीचे संचालक अनिल भारसाकळे यांनी केले.

# जिल्ह्यातील थकबाकीदार शासकीय कार्यालये महावितरणच्या रडारवर

## ◆ २२ जानेवारीला एकाच वेळी वीज पुरवठा खंडित (‘टोकन डिस्कनेक्शन’) ची कारवाई

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अमरावती:** जिल्ह्यात वीजबिलाची कोट्यवधी रुपयांची थकबाकी असलेली शासकीय व सार्वजनिक सेवा देणारी कार्यालये आता महावितरणच्या थेट कारवाईच्या रडारवर आली आहेत. वारंवार सूचना, स्मरणपत्रे,प्रत्यक्ष पाठपुरावा आणि नोंदणीकृत मोबाईलवर मेसेज करूनही वीजबिल भरण्यास प्राधान्य न दिल्याने महावितरणने कठोर भूमिका घेतली असून, येत्या २२ जानेवारी रोजी एकाच वेळी सर्व थकबाकीदार शासकीय कार्यालयांचा चार तासांसाठी वीजपुरवठा खंडित (टोकन डिस्कनेक्शन) करण्यात येणार आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी शासकीय कार्यालयांना तातडीने थकबाकी भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. वीजबिलाची वसुली ही केवळ आर्थिक बाब नसून, त्यावरच महावितरणचे अस्तित्व आणि सेवा अवलंबून असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### कर्मचाऱ्यांवर वीजबिल वसूलीचे ताण

कर्मचाऱ्यांना वीजबिलाच्या वसूलीबाबत विचारण होते किंबहुना त्यांना वसूलीसाठी जबाबदारही धरल्या जाते. महावितरणकडून अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार, स्मरणपत्रे व प्रत्यक्ष संपर्क करूनही जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयाची थकबाकी भरण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सामान्य ग्राहकांकडून थकबाकी राहिल्यास तत्काळ कारवाई केली जाते, मग शासकीय कार्यालयांना सवलत का, असा सवालही उपस्थित होत आहे. शासकीय थकबाकीमुळे महावितरण कर्मचाऱ्यांवरही वसुलीबाबत अतिरिक्त ताण येत असल्याचे चित्र आहे.

**शासकीय कार्यालयांकडे २१९ कोटी ७५ लाख थकीत**

जिल्ह्यातील प्रशासकीय व सार्वजनिक सेवा देणाऱ्या ७,४१७ शासकीय कार्यालयांकडे एकूण २१९ कोटी ७५ लाख ५१ हजार रुपये वीजबिलाची थकबाकी आहे. यामध्ये अमरावती शहरातील १,११३ कार्यालये, अचलपूर, अंजनगाव, चिखलदरा, दर्यापूर, धारणी तालुक्यातील २,४३७ कार्यालये, भातकूली, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, तिवसा तालुक्यातील २,४६७ आणि चांदूर बाजार, मोर्शी, वरूड, शेंदुरजना घाट तालुक्यातील १,४०० कार्यालयांचा समावेश आहे.

**पूर्व सूचना म्हणून ४ तास वीज पुरवठा खंडित करण्याची ( टोकन डिस्कनेक्शन ) कारवाई :** जिल्ह्यातील सर्व थकबाकीदार शासकीय कार्यालयांवर २२ जानेवारीला एकाच दिवशी आणि एकाच वेळी ‘टोकन डिस्कनेक्शन’ची कारवाई करण्यात येणार आहे.

# अमरावती महानगरपालिका मतमोजणीला सुरुवात

## ◆ आठ जागांवर भाजपा तर सहा जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आघाडीवर



प्रतिनिधी १६ जानेवारी

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका निवडणुकी संदर्भ सकाळी आठ वाजता पासून नवसारी परिसरातील क्रीडा संकुलाच्या मैदानावर मतमोजणीला कळत पोलीस बंदोबस्तात सुरुवात करण्यात आलेली आहे. रिंग रोड पासून तर कठोरा नाक्यापर्यंत अमरावती मुख्यमार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. या ठिकाणी नगरा नगरातील रस्ते सुद्धा पोलिसांनी बंद केले आहेत. या ठिकाणी बॅरिकेट्स लावण्यात आलेले आहेत. जवळपास ५०० ते ७०० पोलिसांचा या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अनेक प्रभागातील जागा आघाडीवर असल्याची माहिती आहे. मात्र अद्याप कुठलाही अधिकृत निकाल घोषित करण्यात आलेला नाही. सामान्य मतदारांना व नागरिकांना मतमोजणीच्या ठिकाणी जाण्यास पोलिसांनी बंदी केली आहे.

# यशस्वी उद्योजक होण्यासाठी आर्थिक ज्ञान आवश्यक

## ◆ महाराष्ट्र चेंबर मार्गदर्शन करेल: मंगवे

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अमरावती:** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष रवींद्र मंगवे म्हणाले की, उद्योजक होण्यासाठी आर्थिक ज्ञान आवश्यक आहे, परंतु त्याची अनेकदा कमतरता असते. यामुळे अनेक तरुणांचे ण्ध्रुँथ् धोक्यात येतात आणि त्यांना बँकांकडून मदत मिळू शकत नाही. अशा व्यक्तींना आर्थिक मार्गदर्शन देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर शिबिर आयोजित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल.

**मुंबईत चर्चा होणाऱ्या समस्या:** अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने आयोजित केलेल्या उद्योजकांच्या बैठकीत ते बोलत होते. ते म्हणाले की, प्रत्येक प्रदेशाची स्वतःची विशिष्ट वैशिष्ट्ये आहेत, परंतु त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ नाही. महाराष्ट्र चेंबरचे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी करार आहेत, जे त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीत मदत



करतील. आम्ही लवकरच स्थानिक अधिकाऱ्यांना आमच्या मुंबई कार्यालयात आमंत्रित करू आणि तज्ञांना बोलावून कोणत्याही औद्योगिक समस्येचे निराकरण करण्याची सुविधा प्रदान करू.

प्रमुख पाहुणे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकुमार उर्फ लप्पीभैय्या जाजोदिया यांनी जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सचिव सुरेंद्र देशमुख आणि एमआयडीसीचे विद्यमान अध्यक्ष किरण पातुरकर यांनीही आपले विचार व्यक्त केले. विदर्भ उद्योग महासंघाचे अध्यक्ष परेश राजा यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे वीजदर भारतापेक्षा जास्त आहेत, ज्यामुळे लघु उद्योजक स्पर्धा करू शकत नाहीत. ही एक गंभीर समस्या आहे. या चिंतांची दखल घेत, महाराष्ट्र चेंबरने लवकरच मुंबईतील सरकारी अधिकारी आणि नेत्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. समारंभात चेंबरचे संस्थापक सदस्य देवदत्त शर्मा यांना संस्थेतील योगदानाबद्दल मंगवे यांनी सन्मानित केले. चेंबरच्या कर समितीचे अध्यक्ष ॲड. जगदीश शर्मा यांनी कामकाजाचे संचालन केले आणि डॉ. कुंजन वेद यांनी आभार मानले. यावेळी सतर्नी सहकारी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष ओम प्रकाश नवदार, वीरेंद्र लाढा, मनोज खंडेलवाल, संजय मुनोथ, शेखर लाढा, शाम शर्मा, गोपाल पांडे, ॲड. आर.डी.चांडक, कृष्णराव इंगळे, गोपाळ डागा, राजेंद्र काळे, डॉ.केतकी काल्ले भोकरे, विधी नावदार, गोविंद राठी, राजन अडातिया, प्रकाश राठी, किरण मिश्रा, पुंशी, अर्चना बारबडाई, शरद करवा, राजेश मित्तल, बेदारदश खंडेलवाल आदी उपस्थित होते.

# रेतीच्या अवैध वाहतुकीवर महसूल प्रशासनाची नजर !

## ◆ डोलारखेड, भोनगाव फाट्याजवळ तपासणी नाका

प्रतिनिधी १६ जानेवारी

**खामगाव :** गेल्या अनेक दिवसांपासून एकाच रॉयल्टी वर दिवस-रात्र रेतीची अवैध वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने महसुल विभागाकडे प्राप्त होत होत्या. या पार्श्वभूमीवर अखेर महसूल प्रशासनाने थेट रस्त्यावर उतरून कारवाई सुरू केली आहे. शेगाव तालुक्यातील डोलारखेड, भोनगाव फाट्याजवळ तपासणी नाका उभारण्यात आला असून, अवैध वाहतुकीवर नजर ठेवली जात आहे.

पूर्णा नदीपात्रातील कठोरा, भास्तन, हिंगणा, भोटा या रेती घाटाकडून खामगाव व शेगावकडे जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची सखोल तपासणी केली जात असून, रॉयल्टीची काटेकोर पडताळणी करण्यात येत आहे. ही कारवाई उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी व शेगाव तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. यासाठी विशेष पथकाची नियुक्ती केली असून, या पथकात नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांचा समावेश आहे. कोणतीही अनियमितता आढळल्यास तलाठी व तत्काळ कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे. मात्र, ही कारवाई केवळ कागदापुरती किंवा काही दिवसांपुरती मर्यादित न राहता सातत्याने सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# मध्यरात्री हायवेवर छापा; गुजरात क्रमांकाचा ट्रक ताब्यात, इंधन माफियांमध्ये खळबळ

## ◆ इंधन माफियांमध्ये खळबळ ◆ मलकापूर पोलिसांची अवैध बायोडिझेल वाहतुकीवर धडक कारवाई

प्रतिनिधी १६ जानेवारी

**खामगाव :** मलकापूर शहर पोलिसांनी अवैध बायोडिझेल वाहतुकीवर मोठी कारवाई करत इंधन माफियांना जबरदस्त दणका दिला आहे.

मलकापूर शहर पोलिसांनी अवैध बायोडिझेल वाहतुकीवर मोठी कारवाई करत इंधन माफियांना जबरदस्त दणका दिला आहे. रात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरून गुजरातहून अवैधरित्या बायोडिझेल वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती मिळताच मलकापूर शहर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत ट्रक ताब्यात घेतला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक उव् १८ँ ८३०७ हा मुक्ताईनगरच्या दिशेने येत खामगावकडे जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मलकापूर हायवेवर सापळा रचून मध्यरात्री ही



धडक कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान सदर ट्रकमधून अवैध बायोडिझेल वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईमुळे परिसरातील इंधन माफियांमध्ये एकच खळबळ उडाली असून, अवैध बायोडिझेलचा साठा, वाहतूक परवाने तसेच संबंधित कागदपत्रांची तपासणी पोलिसांकडून सुरू आहे. ट्रक चालकाची कसून चौकशी करण्यात येत असून, या अवैध इंधन रॅकेटमागे नेमके कोण आहेत, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

मलकापूर शहर पोलिसांची ही कारवाई केवळ एका ट्रकपुरती मर्यादित नसून, जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध इंधन व्यापारावर कडक कारवाईचा इशारा असल्याचे बोलले जात आहे. कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि शासनाच्या महसुलावर घाला घालणाऱ्या माफियांविरोधात अशाच धडक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस सूत्रांनी दिला आहे. जानेवारी रोजी रात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरून गुजरातहून अवैधरित्या बायोडिझेल वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती मिळताच मलकापूर शहर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत ट्रक ताब्यात घेतला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक उव् १८ँ ८३०७ हा मुक्ताईनगरच्या दिशेने येत खामगावकडे जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मलकापूर हायवेवर सापळा रचून मध्यरात्री ही धडक कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान सदर ट्रकमधून अवैध बायोडिझेल वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईमुळे परिसरातील इंधन माफियांमध्ये एकच खळबळ उडाली असून, अवैध बायोडिझेलचा साठा, वाहतूक परवाने तसेच संबंधित कागदपत्रांची तपासणी पोलिसांकडून सुरू आहे. ट्रक चालकाची कसून चौकशी करण्यात येत असून, या अवैध इंधन रॅकेटमागे नेमके कोण आहेत, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

# खामगाव रेल्वे स्थानकातील ‘त्या’ हॉटेलचा २४ तासांचा परवाना रद्द करा!

## ◆ पोलिस प्रशासनाची - रेल्वेकडे पत्राद्वारे मागणी

प्रतिनिधी १६ जानेवारी

**खामगाव :** खामगाव शहरातील रेल्वे स्थानक परिसरात २४ तास सुरू असलेल्या एका हॉटेल मुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने ’त्या’ हॉटेलचा २४ तासांचा परवाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी खामगाव शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पवार यांनी रेल्वे प्रशासनाकडे पत्राद्वारे केली आहे.

खामगाव शहर हे अतिसंवेदनशील असून, किरकोळ कारणांवरून यापूर्वीही तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाल्याचा इतिहास आहे. अशा पार्श्वभूमीवर रेल्वे यार्ड परिसरातील हॉटेलमध्ये विनाकारण गर्दी होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या ठिकाणी प्रवासी किंवा रेल्वे कर्मचारी नसताना रात्रीच्या वेळी टवाळखोर व गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक मोठ्या संख्येने एकत्र येतात, अशी माहिती देण्यात आली आहे. खामगाव रेल्वे स्थानका मध्ये रात्री कोणतीही प्रवासी रेल्वे ये-जा करत नसल्याने २४ तास हॉटेल सुरू ठेवण्याची आवश्यकता नसल्याचेही पत्रात नमूद आहे.६ मे २०२५ रोजी या हॉटेलजवळ वाद होऊन खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय, या ठिकाणी वारंवार रेकॉर्डवरील आरोपी आढळून येत असल्याचेही पोलिस निरीक्षकांनी नमूद केले आहे. आगामी काळात गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद, नवरात्रोत्सव व इतर मोठे सण-उत्सव साजरे होणार असून, या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहेत.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## न्यू ईरा हायस्कूल, अकोला येथे दुर्मिळ नाणी व टपाल तिकीटांचे प्रदर्शन

**अकोला:** न्यू ईरा हायस्कूल, अकोला येथे दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत दुर्मिळ नाणी, चलनी नोटा व टपाल तिकीटांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन शाळेचे माजी विद्यार्थी व निवृत्त न्यायालयीन कर्मचारी श्री. मकरंद उंटवाले यांच्या वैयक्तिक संग्रहावर आधारित आहे. प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रा. विश्वनाथ गद्रे (अध्यक्ष, प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला) यांच्या हस्ते व मुख्याध्यापक श्री. महेश ठोके यांच्या उपस्थितीत होणार आहे. या प्रदर्शनात प्राचीन, मध्ययुगीन, ब्रिटिश-इंडिया तसेच स्वतंत्र भारतातील दुर्मिळ नाणी, नोटा, टपाल तिकीटे, फर्स्ट-डे कव्हर्स, जुनी पोस्टकार्ड्स व ऐतिहासिक पत्रव्यवहार पाहायला मिळणार आहे. डिजिटल युगात वाढणाऱ्या विद्यार्थ्यांना इतिहास, चलन व्यवस्था व टपाल खात्याच्या वारशाची ओळख करून देण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणार आहे.

## दिव्यांग मतदार डॉ. विशाल कोरडे यांनी केले मतदान



प्रतिनिधी १६ जानेवारी

**अकोला:** १५ जानेवारी २०२६ स्थानिक अकोला महानगरपालिकेच्या मतदान प्रक्रियेत अकोल्यातील दिव्यांग बांधवांनी आपला सहभाग नोंदवला .दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे संस्थापक अध्यक्ष व श्री शिवाजी महाविद्यालय अकोला चे सहयोगी प्राध्यापक डॉ .विशाल कोरडे यांनी सिद्धार्थ विद्यालय ,लहान उमरी ,अकोला येथे जाऊन आपले मतदान केले . विशेष म्हणजे दिव्यांग मतदारांना मतदान प्रक्रियेत सुलभतेने मतदान करता यावे यासाठी डॉ .विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे विविध उपक्रम गेल्या महिन्याभरापासून राबवल्या गेले आणि दिव्यांगांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी सुद्धा संस्थेद्वारा वाहन व मदतनीस उपलब्ध करून देण्यात आले होते .

## बोरगांव मंजु येथे वर्धापन दिन सोहळा उत्साहात

**अकोला :** श्री संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरीक संघ बोरगांव मंजु रेणुका नगर विरंगुळा केंद्र येथे दि. १३ जानेवारी २०२६ मंगळवार रोजी सकाळी १० वाजता संघाचा १३ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानवांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन, दिपप्रज्वलन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष श्री ह.भ.प. अर्जुन महाराज बारस्कर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून बोरगांव मंजूच्या प.ना. विद्यालयाचे माजी प्राचार्य के. एम. जोशी सर, श्री नाजुकरावजी गमे सर होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ह.भ.प. अर्जुन महाराज बारस्कर यांनी श्री संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरीक संघाच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले तसेच के. एम. जोशी सर, प्रशांत सु. नागे, श्री नाजुकरावजी गमे सर, एस. जी. मोहन सर, पंडित वानखडे सर, सुधीरजी घुटे सर, डि.जी. अंबुलकर, एच. पी. मागे सर, शरद रामकृष्ण भिसे, अभिनेते शाम पिंपळकर यांनी आपले विचार व्यक्त केले.

# मूर्तिजापुरात लोकशाहीचा 'खेळखंडोबा', विरोधात कुणीच उरले नाही

प्रतिनिधी १६ जानेवारी

**मूर्तिजापूर:** येथील नगरपरिषदेच्या मंगळवार, १३ जानेवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत राजकीय समीकरणांचे सर्व निकष पायदळी तुडवले गेल्याचे चित्र पाहायला मिळाले. उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्य निवडीच्या प्रक्रियेत विरोधातील सर्वच नगरसेवकांनी सत्ताधारी भाजपच्या बाजूने कौल दिल्याने, आता सभागृहात 'विरोधी पक्ष' नावाची संकल्पनाच संपुष्टात आली आहे. या प्रकारामुळे शहरात संताप व्यक्त होत असून, निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी जनतेचा विश्वासघात केल्याची चर्चा रंगली आहे.

**'सब मिलके बाट के खायेंगे' : नागरिकांचा संताप**

ठतुम्ही कमवा, आम्हालाही कमवू द्या,ठ अशा स्वरूपाची भूमिका सर्वच नगरसेवकांनी घेतल्याची चर्चा आता मूर्तिजापूर शहरात चौकाचौकात ऐकायला मिळत आहे. ज्या मतदारांनी मोठ्या अपेक्षेने सत्ताधाऱ्यांवर वचक ठेवण्यासाठी विरोधकांना निवडून दिले, त्यांच्या पदरी निराशाच पडली आहे. विरोधी पक्षच शिल्लक न राहिल्याने आता नगराध्यक्ष व सभापतींच्या कामावर कोणाचेही नियंत्रण राहणार नाही. यामुळे नगरपरिषदेचा कारभार मनमानी पद्धतीने चालण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**सत्ताधाऱ्यांचा धाक उरला नाही!**

कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत प्रबळ विरोधी पक्ष असणे गरजेचे असते. मात्र, मूर्तिजापूर नगरपरिषदेत सर्वच्या सर्व 18+6=24 नगरसेवक एकाच बाजूने आल्याने प्रशासनावर सत्ताधाऱ्यांवर कोणाचाही वचक उरलेला नाही. ठनगरपालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारण्यासाठी तर ही एकी झाली नाही ना?ठ असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या अभद्र युतीमुळे शहराच्या विकासाचे प्रश्न मार्गी लागण्याऐवजी वैयक्तिक स्वार्थाचे राजकारण जोमात सुरू झाल्याचे बोलले जात आहे.

**बाळासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेकडे लक्ष**

शहरातील मुस्लिम समाज ९९ज्ञ् शेख इमरान यांचे पाठीशी उभा दिसून येत आहे शेख इमरान यांना स्वीकृत नगरसेवक पासून वंचित ठेवण्यात आले. एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांचे आदेश असतानाही वंचितच्या नगरसेवकांनी भाजपला साथ देऊन स्वीकृत नगरसेवकाला मदत केली आहे या कारणावरून मुस्लिम समाजामध्ये रोष निर्माण झाला वंचित बहुजन आघाडीचे मुर्तीजापुर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजगी व्यक्त केली पदाधिकारी सुद्धा शेख इमरान यांचे पाठीशी उभे दिसते हा विषय खूप मोठ्या प्रमाणात लांबलेला असून एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यावर काय निर्णय देतील याकडे सर्वांचे लक्ष वेधलेले आहे.

**भाजपचे बहुमत नसतानाही 'अजब' जुळवाजुळव**

नगरपरिषदेत भाजपचे संख्याबळ केवळ ११ असतानाही, अत्यंत नाट्यमय घडामोडीत १८ जणांचा एक गट तयार करण्यात आला. यामध्ये भाजपचे ११ नगरसेवक व १ नगराध्यक्ष यांच्यासोबतच शरद पवार गटाचे २ नगरसेवक आणि ४ अपक्ष नगरसेवकांनी हातमिळवणी केली. धक्कादायक बाब म्हणजे, ज्यांच्याकडून प्रबळ विरोधाची अपेक्षा होती, त्या वंचित बहुजन आघाडीच्या ६ नगरसेवकांनीही सत्ताधारी गटालाच साथ दिली. फक्त शिंदे गटाच्या २ नगरसेवकांनी तटस्थ भूमिका घेतली ,पण २ नगरसेवकांचा विरोधी गट तयार होऊ शकत नाही ,यामुळे लोकशाहीत महत्त्वाचा असलेला विरोधी पक्ष आता नगरपालिकेतून अदृश्य झाला आहे.

**वंचितच्या भूमिकेमुळे शेख इम्रान यांची संधी हुकली**

स्वीकृत सदस्य निवडीमध्ये 'वंचित'च्या नगरसेवकांनी आपल्याच पक्षाचे उमेदवार शेख इम्रान शेख खलील यांना पाठिंबा देणे अपेक्षित होते. मात्र, ऐनवेळी या नगरसेवकांनी भाजपचे संजय जयकिसन डागा यांना पाठिंब्याचे लेखी पत्र दिले. परिणामी, शेख इम्रान यांची संधी हुकली आणि डागा यांची निवड सुकर झाली. पक्षाच्या ध्येयधोरणांना बाजूला सारून करण्यात आलेल्या या 'राजकीय तडजोडी'मुळे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्येही मोठी नाराजी पसरली आहे.तर मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज वंचितच्या नगरसेवकावर नाराज होताना दिसत आहे त्याचबरोबर सोशल मीडियावर त्यांच्याविरोधात गद्दाराची भूमिका घेणारे असे अनेक टिप्पणी मुस्लिम समाजाचे युवा पिढी करत आहे मुस्लिम समाजाचा रोज मोठ्या प्रमाणात व्यक्त होताना दिसत आहे आणि त्यांना आम्ही का निवडून दिले याचा पश्चाताप होत आहे इमरानची लहर मुळे आम्ही यांना निवडून दिले असे अनेक बोलणारे मुस्लिम समाजाचे तरुण युवक महिला जेष्ठ नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करत आहे

## गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

वि. प्रतिनिधी १६ जानेवारी



**अकोट:** वंचित बहुजन युवा आघाडीचे राष्ट्रीय नेते सुजातराजे आंबेडकर यांचा वाढदिवस अकोट येथे सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. अकोटमधील वंचित बहुजन आघाडीच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ. लता कांबळे व नगरसेवक इम्रान खान पठाण यांनी ज्येष्ठ नेत्या मंदाताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली प्राथमिक शाळा, अकोट येथे हा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते केक कापून सुजातराजे आंबेडकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट, वही व पेनचे वाटप करून त्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली. गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या मंदाताई कोल्हे, खांडेकर ताई, मंगेश कांबळे, जहीर खान, शारदा वानखडे मॅडम तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## अकोली जहागीर श्री संत संभा महाराज प्रगट दिन उत्सव

प्रतिनिधी १६ जानेवारी

### संगीतमय श्रीमद भागवत महापुराण कथेचे व महाप्रसाद आयोजन



**अकोट:**

***सबका सब सन्मान करे! विश्व स्नेह का ध्यान करेठ!! हर देश मे तू हर वेश मे तू! तेरे नाम अनेक तू एकही है!!***

अकोट तालुक्यामधील संतांची नगरी ओळख असून येथील ब्रह्मालीन श्री संत संभा महाराज प्रगट दिन महोत्सवा निमित्याने अकोली जहागीर येथे शनिवार दि.१० ते शनिवार दि.१७ जानेवारी संगीतमय श्रीमद भागवत महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहेत. कथावाचक परमपूज्य प्रीती देवी जी (ओंकारेश्वर धाम) कथेची वेळ दुपारी १ ते ५ , मुख्य यजमान प्रतापसिंग गोठवाड व सौ मीनाताई प्रताप सिंग गोठवाड आहे. सप्ताहातील कीर्तनकार शनिवार दि.१०/०१/२०२६ हभप. लीनाताई चिमटे पारडासिंग, रविवार दि.११ हभप श्रीकृष्ण महाराज मुळे आळंदीकर, सोमवार दि. १२ हभप वैष्णवीताई गावंडे अकोला, मंगळवार दि.१३ हभप तुषार महाराज पाटील मुक्ताईनगर, बुधवार दि.१४ हभप कृष्णा माऊली सुरडकर भालेगावकर, गुरुवार दि.१५ हभप वैष्णव महाराज बोरोडे अकोट, शुक्रवार दि.१६ हभप सोपान महाराज सानप शास्त्री हिंगोली, शनिवार दि.१७ काल्याचे किर्तन वेळ सकाळी ८ ते ९ हभप श्री वासुदेव महाराज अस्वार अकोली ज., सप्तातील अन्नदाते गजानन घुले, राम सोनोणे, अक्षय हागे, रामकृष्ण ताडे, पंकज ढेंबरे उपसरपंच, अर्चनाताई देशमुख, माणिक साबळे, अशोक देशमुख व शनिवार दि.१७ भव्य महाप्रसाद कार्यक्रमाचे मार्गदर्शक हभप श्री पुरुषोत्तम महाराज घोडिले अकोली ज., असून शनिवार दि.१० ला सकाळी ९ ते ११ वा.कळस यात्रा निघेल, शनिवार दि.१७ ला सकाळी ९ ते १२ भव्य मिरवणूक व दुपारी १२ ते ४ महाप्रसाद या महाप्रसाद विशेष सहकार्य गोमाता महिला मंडळ अकोली ज., जिजाऊ महिला सेवाधारी गट अकोली ज., काळाराम महिला सेवाधारी गट चौसाळा, जय गजानन महिला मंडळ राजुरा, हिंदू गर्जना मित्र मंडळ अकोली ज. लागणार आहे तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रीमत भागवत महापुराण कथा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे भागवत समितीने आव्हान केले आहे भागवत महापुराण कथेचे आयोजन समस्त गावकरी मंडळी भागवत समितीने आयोजन केले आहे.

## हिवरखेडचे तरुण तरुणी भारतीय सैन्यदलात भरती




प्रतिनिधी १६ जानेवारी

**हिवरखेड:** येथील द टारगेट अकॅडेमी चे विदयार्थी रोहित येनकर, चतुर्थी हागे , शिवानी वाकोडे, ऋषिकेश कौसकार , अनिकेत निंबोकार ,.निकिता गावंडे यांची स्टाफ सिलेक्शन कमिशनद्वारे भारतीय सैन्य दलात निवड झाली असून जिद्द चिकाटीने यांच्या मेहनतीचे फळ यांना मिळाले हे या मागचे श्रेय त्यांच्या गुरुजनांना व आई वडील भाऊ बहिणींना मित्र जणांना देतात.

## फडके नगरात संगीतमय रामायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी १६ जानेवारी



**अकोला:** गत सात वर्षापासून कीर्तन उत्सव आयोजित करणाऱ्या स्थानीय फडके नगर डाबकी रोड परिसरातील हनुमान मंदिर उत्सव समितीच्या वतीने यावर्षी ही संगीतमय रामायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.दाबकी रोड, फडके नगर येथील हनुमान मंदिर येथे आयोजित या संगीतमय रामायण व अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ सोमवार दिनांक १९ जानेवारी पासून होणार असून सोमवार दिनांक २६ जानेवारी पर्यंत हा उत्सव सुरू राहणार आहे. यामध्ये रामायण कथा सकाळी ९-३० ते १२-३० ते दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत राहणार असून कीर्तन सेवा रात्री ८ ते १० वाजेपर्यंत राहणार आहे.यात बुलढाणा येथील रामायणाचार्य हभप सुभाष महाराज चव्हाण हे संगीतमय रामायण सादर करणार असून रात्री आठ वाजता किर्तन उत्सव होणार आहे. या कीर्तन उत्सवात सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी मोर्शी येथील हभप किशोर महाराज ठाकरे यांचे कीर्तन होणार असून मंगळवार दिनांक २० जानेवारी रोजी नांदगाव खंडेश्वर येथील हभप उमेश महाराज जाधव यांचे कीर्तन होणार आहे.कीर्तनात बुधवार दिनांक २१ जानेवारी रोजी तामसी बटवाडी येथील हभप किशोर महाराज काळे, गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी पारस येथील हास्याचार्य हभप अरुण महाराज लांडे यांचे कीर्तन होणार आहे.शुक्रवार दिनांक २३ जानेवारी रोजी मोर्शी येथील हभप प्रदीप महाराज पडोळे, शनिवार दिनांक २४ जानेवारी रोजी झाशी पडशी येथील हभप प्रमोद महाराज राहणे, रविवार दिनांक २५ जानेवारी रोजी हभप सुभाष महाराज चव्हाण यांचे कीर्तन होऊन सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हभप तुकाराम महाराज सखारामपुरकर इलोरा यांचे काल्याचे किर्तन होऊन या संगीतमय रामायण व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे. उत्सव प्रारंभी सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता कलश ग्रंथदिंडी आयोजित करण्यात आली असून रविवार दिनांक २५ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता ग्रंथ दिंडी शोभायात्रा दाबकी रोड परिसरात निघणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

# जितापूर शेतशिवारात झटका मशीन चोरणाऱ्या भुरट्या टोळीची दहशत

प्रतिनिधी १६ जानेवारी



**अकोट:** अकोट तालुक्यातील सातपुड्यातील ग्राम जितापूर रूपागड , पिंपरी परिसरात शेत शिवारातील झटका मशीनची भुरट्या म्द चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने शेतकऱ्यांमध्ये सध्या मोठी दहशत वातावरण निर्माण झाले या भागात मागील वर्षी झटका मशीन चोरीचे सत्र सुरू होते मोठ्या प्रमाणावर बागायती शेती असून पहाडी भागात रात्रीला या परिसरात वन्य प्राण्यांच्या मोठ्या प्रमाणात हैदोस वाढला असून शेतीपिकांचे अतोनात नुकसान होत आहे जितापूर येथील शेतकरी भागवत शहादेव मंगळे यांच्या गट नंबर ९९ मधील मंगळवार दि.१३ रात्री अज्ञात व्यक्तीने मीटर पेटीचे कुलूप तोडून झटका मशीन चोरून नेल्याची घटना घडली गेल्या महिन्यात पॅक गोठ्यामधील फोर व्हीलर गाडीचे साईड ग्लास व काचा अशा दोन वेळा फोडण्यात आल्या या परिसरातील शेतकऱ्यांनी स्वतः च्या पिकाचे संरक्षण म्हणून शेतात चारही बाजूने तार बांधून त्यावर झटका मशीन लावल्या आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून अज्ञात चोरट्यांकडून शेतातील मीटर पेठ्यांचे कुलूप तोडून ह्या झटका मशीन चोरून सपाटा लावला घटनांमध्ये वाढ झाली आहे. या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील ६ शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून त्यांचे अंदाजे २१००० हजार रु. व स्पिंकलर पाईप व नौउजल १५००० हजार रु. व बैलगाडी साहित्य व स्पिंकलर पाईप असे अंदाजी ३५००० हजार रु. आर्थिक नुकसान झाले आहे. व पिकांच्या संरक्षणाचा प्रश्न सुध्दा गंभीर बनला आहे.रात्रीला बिबट्या वाघ यांची दहशत वाढल्यामुळे शेताकडे जाणे सहसा टाळले जात असून मागील वर्षी याच शेत शिवारातील प्रफुल्ल मधुकर मंगळे, विठ्ठल नामदेव बहिरे, योगेश हरिभाऊ मंगळे, रामहरी रमेश मंगळे, करण विलास लबडे, गजानन शिंगणे जीतापूर रुबा गड येथील सूनलाल सोलकर मधुकर सोलकर पोलीस पाटील श्रीराम भारसाकडे या तिन्ही शेतकऱ्यांचे झटका मशीन केबल वॉटर पंप पिंपरी सह शेतकरी बजरंग राजेंद्र मानकर यांच्या शेतातील बैलगाडी व १५ स्पिंकलर पाईप शेतातील झटका मशीन चोरीमुळे शेतकऱ्यांना पुन्हा नवीन झटका मशीन आणून बसविण्यासाठी मोठा खर्च करावा लागत असून या वन्य प्राण्यांच्यामुळे पिकांचे नुकसानही होत आहे. या होणाऱ्या चोरीच्या भुरट्या चोरांच्या टोळीचां बंदोबस्त करण्यासाठी हिवरखेड पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. या परिसरातील झटका मशीन चोरी करणाऱ्या टोळीला पोलिसांनी रंगेहात पकडून कडक कारवाई करावी शेतकऱ्याला न्याय द्यावा अशी सर्व शेतकरी वर्ग मागणी करत आहे, यावेळी जीतापूर सरपंचपती विठ्ठल मंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष सचिन मंगळे, ऋषी लोणकर, यांची मागणी असून समाजसेवक संजय शेळके यांनी स्वतः या चोरीच्या प्रकरणाला उलगळा बसण्यासाठी ५००१ हजार बक्षीस जाहीर केले आहे त्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल असे आवाहन सुद्धा केले आहे.

न शिवदांडाच्या शेतात गट नंबर ९९ शेत शिवारात वाघ बिबट मोठी दहशत आहे लावलेल्या झटका मशीन चोरी गेल्या अंदाजे २१००० हजार रु. नुकसान झाले संबंधित पोलिसांनी तात्काळ बंदोबस्त व शोध लावून न्याय द्यावा,

**भागवत शहादेव मंगळे**
जीतापूर शेतकरी,

गट नंबर २४ चोरवळ खु. बैलगाडीचे साहित्य व स्पिंकलर पाईप चोरून नेले अंदाजी ३५००० हजार रु. नुकसान होऊन मला न्याय मिळाला नाही.

**बजरंग राजेंद्र मानकर**
पिंप्रि शेतकरी

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# खोदकामात पुरातन शिवलिंग, नंदी व शिवपिंड सापडले





## हरहर महादेवच्या जयघोषात विधीवत पूजा संपन्न



प्रतिनिधी १६ जानेवारी

**यवतमाळ** : जिल्ह्यातील कळंब शहरातील श्रीनगरी परिसरात आज गुरुवारी सकाळी अचानक एक ऐतिहासिक व धार्मिक घटना उघडकीस आली. सारडे ले-आऊट येथील ओपन प्लेसवर सावित्रीबाई फुले माळी समाज भवनाचे बांधकाम सुरू असताना जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम केले जात होते.

सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास जमिनीखाली सुमारे सहा फूट खोल काळ्या पाषाणातील सुबक शिवलिंग, नंदी व शिवपिंड आढळून आले. ही माहिती वाऱ्यासारखी शहरात पसरताच नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली. पुरुष, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली.

काही नागरिक हार, फुले, कुंकू घेऊन आले तर काहींनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला. हरहर महादेवच्या जयघोषात तिन्ही मूर्ती पाण्याने स्वच्छ करून विधीवत पूजा करण्यात आली. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी खोदकामात या मूर्ती सापडल्या, त्याच ठिकाणी त्यांची प्रतिष्ठापना करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार धीरज स्थुल यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या घटनेमुळे श्रीनगरी परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये उत्सुकता व श्रद्धेची भावना दिसून येत आहे.

# बनावट जन्म, मृत्यू नोंद प्रकरण; बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश येथून चार आरोपी अटक

प्रतिनिधी १६ जानेवारी



**यवतमाळ** : ग्रामपंचायत शेंदुरसणी व भवानी येथील CRS (Civil Registration System) पोर्टलमध्ये अनधिकृत प्रवेश करून बनावट जन्म प्रमाणपत्र तयार करण्याचा सायबर फसवणुकीचा जाळा यवतमाळ पोलीसांना उघडकीस आणण्यात यश आले आहे. या प्रकरणात बिहार, उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश येथून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ताबीश असगर अली (27, सिकराना, ढाका, मोतीहारी), संतोष रमाशंकर गुप्ता (23, पिपरा रामधर, देवरीया), प्रसुन प्रेमनारायण कुमावत (22, कानवन, बदनावर, धार) , शरद श्यामसुदंर जायसवाल (25, कानवन, बदनावर, धार) अशी आरोपींची नावे आहे. दि. 16 /12/2025 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा जन्म-मृत्यु नोंद बाबत डॉ. सुभाष शाहाजी ढोले यांनी तक्रार दिली होती. ग्रामपंचायत शेंदुरसणीची लोकसंख्या फक्त 1400 असताना सप्टेंबर 2025 ते नोव्हेंबर 2026 दरम्यान CRS पोर्टलमध्ये 27,397 जन्म नोंदी व 7 मृत्यू नोंदी आढळल्याचे आढळले. या संशयास्पद नोंदींवरून सायबर फसवणुकीचा गुन्हा नोंदवला गेला. गुन्ह्याच्या तपासासाठी कुमार चिंता, पोलीस अधिक्षक यवतमाळ, अशोक थोरात, अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे, सपोनि श्रीकांत जिंदमवार, पोउपनि सागर भारस्कर आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी तपास करत प्रमुख आरोपींची माहिती गोळा केली. बिहार येथून ताबीश असगर अली (27, सिकराना, ढाका, मोतीहारी), उत्तरप्रदेश येथून संतोष रमाशंकर गुप्ता (23, पिपरा रामधर, देवरीया), मध्यप्रदेश येथून प्रसुन प्रेमनारायण कुमावत (22, कानवन, बदनावर, धार) व शरद श्यामसुदंर जायसवाल (25, कानवन, बदनावर, धार) यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून मोबाईल, लॅपटॉप व इंटरनेट राउटर जप्त करण्यात आले.

सदर प्रकरणातील आरोपींची पोलीस कोठडी 20 जानेवारी 2026 पर्यंत न्यायालयीन मंजुरीने वाढवण्यात आली आहे.

हा गुन्हा अत्यंत किचकट असून, यवतमाळ पोलीसांच्या तपास यंत्रणेने सायबर फसवणुकीचा संपूर्ण जाळा उघडकीस आणला आहे. तपास सुरू असून आणखी आरोपींवर कारवाई करण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई कुमार चिंता, पोलीस अधिक्षक यवतमाळ, अशोक थोरात, अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे मार्गदर्शनामध्ये तपास अधिकारी दिनेश बैसाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ, पोलीस निरीक्षक. यशोधरा मुनेश्वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक सागर भारस्कर, पोलीस अंमलदार गजानन कोरडे, अन्सार बेग, मिलींद दरेकर, विशाल भगत, मोहम्मद भगतवाले, पवन नांदेकर, विकास कमनर, प्रविण उइके, अजय निंबोळकर, सारंग शेंडे, आकाश खेत्रे, अभिनव बोंद्रे, पुजा भारस्कर यांनी केली.

# 'बेधुंदकार' गोविंद पोलांड व प्रा. निरंजन राठोड यांचे व्याख्यान

प्रतिनिधी १६ जानेवारी

**फुलसावंगी** : आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साधून, फुलसावंगी पत्रकार संघाने विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी विशेष मार्गदर्शन व्याख्यान आयोजित केले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते 'बेधुंदकार' गोविंद पोलांड आणि प्रा. निरंजन राठोड उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम शनिवार, १७ जानेवारी, सकाळी ११ वाजता, स्व. सुधाकरराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय, फुलसावंगी येथे होणार आहे. यावेळी तहसीलदार महागाव अभय मस्के, ठाणेदार महागाव धनराज निळे, उपसरपंच कुणाल नाईक, तसेच शिक्षक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. पत्रकार संघाने सांगितले की, "सध्याच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा," या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे. गोविंद पोलांड यांची 'बेधुंद' शैली आणि प्रा. राठोड यांचे शैक्षणिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थी, पालकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले.

# सफाई कामगारावर प्राणघातक हल्ला; दगडफेकीत तणाव

प्रतिनिधी १६ जानेवारी

**उमरखेड** : शहरातील नागचौक परिसरात एक सफाई कामगार व त्याच्या कुटुंबीयांवर तलवार व चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला. उमरखेड पोलीस स्टेशनमध्ये साहील तुलसीराम पटोणे (वय 21, रा. नागचौक) यांनी तक्रार दाखल केली असून, आरोपींविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व अन्य गंभीर भादवी कलमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे. साहील पटोणे, त्यांचा भाऊ कुणाल आणि भाचा कृष्णा डेंडवाल हे नागचौक परिसरात उभे असताना शेख शाहरुख, अक्कु व अस्लम हे तिथे आले. शेख शाहरुखकडे तलवार तर अक्कुच्या हातात मोठा चाकू होता. जातीय शिवीगाळ करत अपमानास्पद शब्द वापरले आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केला. शेख शाहरुख यांनी साहील यांच्या डोक्यावर तलवारीने वार करण्याचा प्रयत्न केला, तर अक्कुने कुणालच्या पोटात चाकू खुपसण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने कामगारांनी आपले प्राण वाचवले. त्यानंतर 6–7 जणांनी परिसरात दगडफेक केली, ज्यात रस्त्यावरचे काही नागरिक जखमी झाले. एका जखमी इसमाला स्थानिक नागरिकांच्या मदतीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेमुळे नागचौक परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाकडे सोपवत आहेत.

# अधर-पुस प्रकल्पाची कालवा साफसफाई 'थातूरमातूर'

## कंत्राटदार व अधिकाऱ्यांकडून लाखो रुपयांची लुट!


प्रतिनिधी १६ जानेवारी

**महागाव** : अधर-पुस प्रकल्पाच्या कालव्यांची साफसफाई 'थातूरमातूर' पद्धतीने केली जात असल्याचे चित्र समोर आले आहे. मुख्य कालव्यांसह उपकालव्यांमध्ये दरवर्षी शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो, तरी प्रत्यक्षात कालव्यांची अवस्था जसाची तशी आहे. यामुळे सिंचन विभागाची कार्यक्षमता वादाच्या भोवऱ्यात आलेली आहे.

रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्यापूर्वी कालव्यांमधील गाळ काढणे, झाडे-झुडपे कापणे आणि दुरुस्ती करणे आवश्यक असते. मात्र, यावर्षी कंत्राटदारांनी हे काम केवळ नाममात्र केले असून, अनेक ठिकाणी कालव्यात अद्यापही कचरा आणि झाडे आहेत. फक्त वरवरची साफसफाई करून देयके लाटण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये आहे.

कालवे व्यवस्थित नसल्यामुळे पाण्याचा प्रवाह मंदावतो आणि शेवटच्या टोकातील शेतकऱ्यांपर्यंत पाणी वेळेवर पोहोचत नाही. स्थानिक शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करत म्हटले, "आम्ही दरवर्षी पाणीपट्टी भरतो, पण कालवे तुंबलेले असल्यामुळे पाणी शेतात पोहोचत नाही. फक्त फोटो काढण्यासाठी साफसफाई केली जाते." दरवर्षी शासनाकडून कालव्यांच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी भरीव निधी दिला जातो.

मात्र, अनेक ठिकाणी यंत्राचा वापर न करता जुजबी काम दाखवून निधी हडप केला जात असल्याचे आरोप आहेत. गाळ काढण्याचे काम अपुरे असल्यामुळे झुडपांमुळे पाण्याची गती मंदावते आणि गळतीचे प्रमाण वाढते. जर येत्या काही दिवसांत वरिष्ठ स्तरावरून चौकशी किंवा दर्जेदार काम झाले नाही, तर संतप्त शेतकरी सिंचन विभागाच्या कार्यालयावर धडक देण्याच्या तयारीत आहे.



# खुनातील दुसरा आरोपी अटक



प्रतिनिधी १६ जानेवारी

**कळंब** : कळंब तालुक्यातील बेलोरी परिसरात शेतजमिनीच्या जुन्या वादातून शेतकरी श्रीराम लक्ष्मण सुरपाम यांचा खून झाला होता. या प्रकरणी वडगाव जंगल पोलिसांनी संभा धर्माजी गाडेकर (४८, रा. बेलोरी) याला अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यास १७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी देण्याचा आदेश दिला. दुसऱ्या आरोपीला राळेगावातून अटक करण्यात आली. तपासात समोर आले आहे की, मृतकाशी आरोपींचा वाद तीन एकर शेती पत्नीच्या नावावर करण्याच्या कारणावरून सातत्याने सुरू होता. रागाच्या भरात आरोपीने दगडाने मारहाण करून खून केला, तर मृतदेह शेतातील तुरीच्या ओळीत ओढून टाकल्याचे तपासात उघड झाले आहे. आरोपींच्या चौकशीसह आणखी पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास ठाणेदार विकास दांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय भाऊराव बोकडे आणि जमादार धनंजय शेखदार करीत आहेत.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून विकासाला गती : प्रशांत पाटील

प्रतिनिधी १६ जानेवारी




**आर्णी** : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान हे केवळ कचरा व्यवस्थापनापुरते मर्यादित न राहता वर्तनात्मक बदल, आरोग्यदायी सवयी आणि शाश्वत विकासाचा संगम आहे, असे प्रतिपादन विस्तार अधिकारी (आरोग्य) प्रशांत पाटील यांनी केले. अंबोडा ग्रामपंचायतीने स्वच्छतेसाठी उल्लेखनीय प्रयत्न केले असून ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग गावाच्या विकासाला गती देईल, असेही त्यांनी सांगितले.

आर्णी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या अंबोडा येथे जिल्हास्तरीय तपासणी पथकाने ग्रामपंचायतीच्या स्वच्छता उपक्रमांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. तपासणी पथकात प्रशांत पाटील, स्वच्छ भारत मिशनचे जिल्हा समन्वयक भारतभाऊ चव्हाण, पंचायत समिती आर्णीचे विस्तार अधिकारी (पंचायत) गोविंद इंगोले आणि स्वच्छ भारत मिशन आर्णीचे एस. एस. जाधव उपस्थित होते.

ग्रामपंचायतीकडून तपासणी पथकाचे स्वागत करून स्वच्छता मोहिमेतील उपक्रमांची माहिती सादर करण्यात आली. गावात दररोज स्वच्छता मोहीम, ओला-सुका कचरा विभाजन, प्लास्टिकविरहित गाव उपक्रम, विषमुक्त परिसर अभियान तसेच शाळांमधून स्वच्छता जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे सरपंच वर्षाताई बाबाराव आडे, उपसरपंच चंचलाताई ज्ञानेश्वर पावडे, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर, मुख्याध्यापक अंकुश मोरे, पैनगंगा प्रोड्युसर कंपनी व दाल मिलचे संचालक माधव राऊत आणि प्रतिष्ठित नागरिक बाबाराव आडे यांनी सविस्तर माहिती दिली. तपासणी दरम्यान सार्वजनिक शौचालये, अंगणवाडी केंद्र, शाळा परिसर, नाला स्वच्छता आणि ओला-सुका कचरा वर्गीकरणाचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. तपासणी पथकाचा अहवाल लवकरच जिल्हा प्रशासनाकडे सादर केला जाईल, त्यावर पुढील कार्यवाही होईल.

# तेली समाजाचा भव्य वधू-वर परिचय मेळावा

प्रतिनिधी १६ जानेवारी

**यवतमाळ** : तेली समाज विवाह व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वशाखीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी संकट मोचन रोडवरील श्री संताजी मंदिर प्रांगणात होईल, असे अध्यक्ष महेश रामभाऊ होले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावर्षी ४८८ वधू-वरांची नोंदणी करण्यात आली असून, त्यांचा परिचय देण्यासाठी भव्य मंचाची व्यवस्था केली जाणार आहे. जिल्हा व जिल्ह्याबाहेरून ५ ते ६ हजार समाजबांधव या कार्यक्रमात उपस्थित राहतील, असे नियोजन केले गेले आहे.

मेळाव्याचे उद्घाटन आमदार बाळासाहेब मांगुळकर करणार आहेत, अध्यक्षस्थानी महेश रामभाऊ होले, तर मुख्य अतिथी म्हणून माजी खासदार व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष रामदास तडस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे, महासभेचे सरचिटणीस भूषण कर्डिले, ज्येष्ठ समाजसेवक शंकरराव हिंगासपूरे उपस्थित राहणार आहेत. सहभागासाठी प्रमुख अतिथी म्हणून शैलेश गुल्हाने, संतोष ढवळे, प्रभाकर सव्वालाखे, किशोर जिरापुरे, संजय जिरापुरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहतील. पत्रकार परिषदेला सचिव देविदास देऊळकर, सुरेशराव अजमिरे, विद्याताई पोलादे, अशोक जयसिंगपूरे, प्रकाश मुडे, दामोदर मोगरकर, सुरेश जयसिंगपूरे, राजेश चिंचोरे, जितेंद्र हिंगासपूरे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# जिजाऊ जयंतीनिमित्त 'स्वागत स्त्री जन्माचे'

## कन्यारत्नांचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी १६ जानेवारी

**उमरखेड** : स्वराज्याची जननी, राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांच्या विचारांना मानवंदना देत आणि स्त्रीशक्तीच्या सन्मानाचा संदेश देत उमरखेड येथे 'स्वागत स्त्री जन्माचे' हा समाजप्रबोधनात्मक उपक्रम भावनिक वातावरणात पार पडला. जिजाऊ आऊसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून राजाराम उत्तरवार उपजिल्हा रुग्णालयात हा उपक्रम राबविण्यात आला.

इंटरनॅशनल आयकॉन पुरस्कार व ISO मानांकन प्राप्त जिव्हाळा संस्था, उमरखेड (जि. यवतमाळ) यांच्या वतीने मागील बारा वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणारा हा उपक्रम 'लेक वाचवा, लेक वाढवा, लेक शिकवा' या विचारधारेवर आधारित आहे. जिजाऊ जयंतीदिनी कन्यारत्नाचे वरदान लाभलेल्या उमरखेड तालुक्यातील मातांचे विशेष स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

रुग्णालयातील महिला कर्मचारी इनचार्ज चलावार सिस्टर, इनचार्ज फुटाने सिस्टर, केंद्रे सिस्टर, मुके सिस्टर, पतंगे सिस्टर व नांदेकर सिस्टर यांच्या हस्ते नवजात कन्यारत्नांचे स्वागत करण्यात आले. या वेळी कन्यारत्नासाठी ड्रेस, मातेसाठी ब्लाउज पीस, वडिलांसाठी शेला, पेडे व पुष्पगुच्छ देऊन पालकांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी जिव्हाळा संस्थेचे अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार यांनी सांगितले की, जिव्हाळा संस्था यवतमाळ, हिंगोली, नांदेड व गडचिरोली जिल्ह्यांत गेल्या बारा वर्षांपासून नवजात कन्यांचे स्वागत करत असून स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध, कन्याशिक्षण आणि मातृत्व सुरक्षिततेसाठी जनजागृतीचे कार्य करत आहे. प्रसूती शासकीय रुग्णालयातच व्हावी, यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे.



आजही समाजात मुलींचा जन्मदर घटत असून स्त्रीभ्रूणहत्येसारख्या अमानवी प्रवृत्ती समाजाला काळिमा फासत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी कायद्यांबरोबरच सकारात्मक विचारांची नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मुलगी म्हणजे ओझे नसून ती कुटुंबाची ताकद आणि राष्ट्राचे भविष्य आहे, हा विश्वास समाजात रुजवणे हेच संस्थेचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला जिव्हाळा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार, रुग्णालयातील कर्मचारी इनचार्ज चलावार सिस्टर, इनचार्ज फुटाने सिस्टर, केंद्रे सिस्टर, मुके सिस्टर, पतंगे सिस्टर, नांदेकर सिस्टर तसेच जिव्हाळा संस्थेचे स्वयंसेवक श्रीकांत शहा, अभय उबाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नांझा येथून 'अरुणोदय' मोहिमेचा शुभारंभ; सिकलसेलमुक्त समाजाचा ध्यास!

प्रतिनिधी १६ जानेवारी




**यवतमाळ** : जिल्ह्यातील सिकलसेल ॲनिमिया या आनुवंशिक आजाराचा पूर्णतः उच्छेदन करण्यासाठी आरोग्य विभागाने राबवलेली 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' आज नांझा (ता. कळंब) येथून जिल्हास्तरीय शुभारंभासह सुरू झाली. ही मोहिम १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान चालणार आहे.

उद्घाटन सोहळा सरपंच रेखाताई हसतबांधे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, तर प्रमुख उपस्थितीत अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतीकुमार नावंदीकर, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. नितेश उपाध्याय, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुकर मडावी, उपसरपंच विनोद शेळके, तसेच स्थानिक शिक्षक, आरोग्य कर्मचारी,ग्रामस्थ होते. डॉ. सुभाष ढोले म्हणाले, "सिकलसेल हा आनुवंशिक आजार आहे, पण वेळेवर तपासणी व उपचार केल्यास नियंत्रण शक्य आहे. प्रत्येक पात्र नागरिकाची तपासणी करण्याचे उद्दिष्ट या मोहिमेचे आहे." तर डॉ. नितेश उपाध्याय यांनी माता-बालकांमधील सिकलसेल निदानाचे महत्त्व ठळक केले. कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी, आरोग्य सहाय्यक, आशा स्वयंसेविका यांनी गावात जनजागृती रॅली काढण्याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी सर्व नागरिकांना आपली आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. या मोहिमेमुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये सिकलसेल बाबत जागरूकता वाढेल, आरोग्य सुधारण्याचा मोठा मार्ग उघडेल, असे आयोजकांनी सांगितले.

## पत्रकार नंदलाल पवार यांची न.प.स्वीकृत सदस्य पदी निवड



**मंगरूळपीर :** येथील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले दानशूर व्यक्तिमत्व प्रा नंदलाल पवार हे गेली अनेक वर्षापासून पत्रकार त्याच्या माध्यमातून गोरगरिब सामान्य जनतेला न्याय मिळवून दिला तसेच कोरोना काळात अनेकांना भरीव आर्थिक मदत दिली त्याशिवाय गतकाळात शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या तालमीत अनेक विद्यार्थी घडले आहेत सध्यास्थितीत अनेक विद्यार्थी शासकीय सेवेत मोठ्या पदावर रुजू आहेत एवढेच नव्हे तर झाडांची संख्या कमी झाल्यामुळे पर्यावरणाचा निसर्गाचा समतोल बिघडला त्यामूळे पावसाचे प्रमाण घटले ही बाब लक्षात घेऊन तालुक्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे काम अविरतपणे करीत आहेत त्यांच्या या कार्याची दखल घेऊन ज्येष्ठ पत्रकार नंदलाल पवार यांची मंगरूळपीर नगर परिषद स्वीकृत सदस्यपदी हा अविरोध निवड करण्यात आली. या निवडीचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

# अल्पभूधारक शेतकऱ्याचा टाहो, माझी ४८ गुंठे जमीन वाचवा हो!

## ठेकेदार व अधिकाऱ्यांचे भ्रष्टधोरण, अल्पभुधारक शेतकऱ्याचे मरण...


शनिवार दि.१०जानेवारी २०२६
सिटी न्यूज सुपरफास्ट
ठेकेदाराची मुजोरी, अभियंत्याशी हातमिळवणी, गरिबाच्या शेतात पाणी!
कोयाळी - नेतन्सा - डोणगावकडे जाणाऱ्या...
रस्त्याचे चुकीचे काम, भ्रष्टाचारातून मिळाला दाम!
*नुकसानग्रस्त शेतकऱ्याची वरिष्ठांकडे तक्रार * संबंधित विभागाचा कारवाई न करण्याचा करार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यातील कोयाळी जाधव येथील अल्पभूधारक शेतकरी मोहन बबन जाधव आणि त्यांची आई असे हे दोघे जण स्व. बबन जाधव यांच्या निधनानंतर हलाकीच्या परिस्थिती जीवन जगत आहेत. त्यांच्याकडे वडिलोपार्जित असलेली केवळ ४८ गुंठे जमीन असून तेच उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. मात्र हलाकीची परिस्थिती आणि निराधार असलेल्या या कुटुंबावर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या ठेकेदाराने आणि सबंधित कामाच्या अभियंत्याने घाला घातला असल्याची धक्कादायक माहिती मोहन जाधव यांनी सिटीन्यूज सुपरफास्टशी बोलतांना दिली आहे.

या कुटुंबाकडे केवळ ४८ गुंठे जमीन असून सदर जमिनीजवळून नेतन्सा, डोणगावकडे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या रस्त्याचे काम सुरू आहे. परंतु कोयाळी नजीकच्या नाल्यावर ज्या पुलाचे बांधकाम सुरू आहे. ते शासकीय अंदाजपत्रकात दर्शविल्यानुसार होत नसल्याचा आरोप केला जात आहे. परिणामी धनदांडग्यांच्या पुढे नतमस्तक होत सदर पूल व रस्त्याचे काम जाणीवपूर्वक आमच्या शेतात वळवला असल्याचे जाधव कुटुंब सांगत आहेत. याबाबत जाधव यांनी कार्यकारी अभियंता कार्यालय वाशिम यांच्याकडे तक्रार केली आहे. मात्र अद्यापही त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नसल्याने हे अल्पभूधारक व निराधार कुटुंब न्यायासाठी टाहो फोडत आहे.








प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात बेजबाबदार ठेकेदारांकडून काम निकृष्ट दर्जाचे करणे आणि नियमांचे पालन न करता स्वार्थासाठी नियमबाह्य कामे करणे ही आता नित्याचीच बोंब होऊन बसली आहे. मात्र याबाबत वारंवार तक्रारी दाखल होऊनही सबंधित प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठलीही दखल न घेणे ही सर्वात मोठी आश्चर्यकारक बाब ठरत आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसारख्या महत्वाच्या योजनेत ठेकेदाराच्या मनमानीमुळे कोयाळी जाधव येथील एका गरीब शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले असल्याची माहितीसमोर येत आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात अनियमितता व चुकीच्या पद्धतीने काम करण्यात आले असल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अभियंता, कार्यालय प्रधानमंत्री ग्राम सडक योजना वाशिम यांच्याकडे करण्यात आली आहे.सदर तक्रारीत म्हटले आहे की,कोयाळीकडून नेतन्सा डोणगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे काम चुकीच्या पद्धतीने होत असून, या चुकीच्या कामामुळे माझे कधीही भरून न निघणारे नुकसान होत असल्याचा आरोप सबंधित शेतकऱ्याने केला आहे.

प्रस्तावित पूल व आराखड्यातील रस्ता विसंगत असल्याचा आरोप सुद्धा करण्यात आला आहे. परिणामी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना नव्हे; तर भ्रष्टाचार बेधडक योजना असल्याचे कोयाळी येथील नागरिक अपरोधाने बोलत आहेत.

> आमच्याकडे वडिलोपार्जित केवळ ४८ गुंठे जमीन असून आई व विवाहित तीन बहिणींची देखभाल आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह याच जमिनीवर अवलंबून आहे. मात्र ठेकेदार आणि इंजिनिअर यांनी संगनमत करून आर्थिक लोभापायी सदर रस्ता व पूल आमच्या शेतात वळवला आहे. त्यामुळे भविष्यात आमच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये अशी आमची शासनाकडे विनंती आहे.
>
> **मोहन बबन जाधव**
>
> तक्रारदार शेतकरी, कोयाळी बू. ता. रिसोड

## थोडक्यात

### ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा जिल्हा दौरा

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे दि. १९ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे. सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी अमरावतीहून दुपारी २.३० वा. मानोरा विश्रामगृह येथे आगमन व तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी बैठक व चर्चा. दुपारी ३ वाजता आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना भेट, तद्नंतर सोयीनुसार अमरावती मार्गे काटोलकडे प्रयाण करतील.

### राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती दिनी वृक्ष वाटप



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर राहणाऱ्या आरोळी सामाजिक संस्थेच्या शाखा कार्यालय चेहेल येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे आयोजन शहन येथील युवकांनी पुढाकार घेऊन राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त गावातील महिला पुरुषांना वृक्ष वाटप करून कटकशाने संगोपन करावी अशी यावेळेस सुचविले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन आरोळी चे दिनेश चौधरी यांनी केले असून अध्यक्षस्थानी प्रा. प्रमोद तायडे प्रमुख उपस्थिती पोलिस पाटील सुनील चौधरी , तंटामुक्ती अध्यक्ष विनोद चौधरी हे होते . यावेळी उपसरपंच प्रदीप पाटील चौधरी ,शिक्षिका अर्चना रामेश्वर चौधरी , यांनी मोलाच्या मार्गदर्शन केले. तसेच अंगणवाडी सेविका सुनीता चौधरी , आशा वर्कर सविता चौधरी , गोपाल पाटील चौधरी , गणेश पाटील चौधरी , मुरली पाटील चौधरी , श्रीकांत पाटील चौधरी भाऊराव पाटील , बालाराम पाटील सह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगर 'सेवक' नव्हे; खरा जन 'सेवक'..!

## निवडणूक झाली, पण सेवा थांबली नाही; शेख नूर भाई ठरले खरे नगरसेवक

• अतिष देशमुख @ वाशीम •

नगरपालिका निवडणुकीचा निकाल लागून १२ दिवस झाले असले तरी बहुतांश लोकप्रतिनिधी जनतेपासून दूर गेलेले दिसतात. मात्र याला अपवाद ठरत आहेत नगरसेवक शेख नूर भाई. निकाल लागल्याच्या दुसऱ्याच दिवसापासून ते दररोज सकाळी आपल्या वार्डात फिरून नागरिकांच्या अडचणी समजून घेत आहेत.









वार्डातील नाल्या साफ करणे, स्वच्छतेच्या समस्या, नळ आली की नाही, पाणी मिळाले की नाही, रस्त्यावर लाईट लागली की नाही, राम मंदिराच्या मागे बालाजी मंदिराच्या मागे बंद पडलेली लाईट सुरु केले.तसेच दैनंदिन नागरी प्रश्नांवर नूर भाई स्वतः लक्ष देत आहेत. प्रत्येक नागरिकाजवळ जाऊन ते थेट विचारतात, 'काय काम आहे? कोणती अडचण आहे?' तुमची तब्येत कशी आहे कोणाला दवाखान्यात जायचे आहे का?आणि त्यावर तात्काळ उपाय करण्याचा प्रयत्न करतात. निवडणूक संपल्यानंतरही सलग १२ दिवसांपासून शेख नूर भाई रोज नागरिकांना भेटत असून त्यांच्या समस्या ऐकून घेत आहेत. निवडणुकीपूर्वी मोठी आश्वासने देऊन निवडणूक झाल्यावर जनतेकडे दुर्लक्ष करणारे अनेक लोकप्रतिनिधी असताना, नूर भाई यांनी मात्र कृतीतून वेगळेपण दाखवून दिले आहे. लोकसेवा ही केवळ निवडणुकीपुरती नसून ती सातत्याने केली पाहिजे, याचा आदर्श नूर भाई यांनी घालून दिला आहे. त्यामुळेच आज वार्डातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, शेख नूर भाई यांच्याकडे खऱ्या अर्थाने जनतेसाठी काम करणारा नगरसेवक म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे ती निवडणूक झाल्यावर निवडणुकीपुरते नव्हे तर खरे जनसेवक बनत आहेत.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त जिल्हा ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन



**वाशीम :** मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, वाशीम येथे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वाशीम येथील सुप्रसिद्ध कथाकार व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय जाधव तसेच अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे कार्यवाह डॉ. सीतारामजी नालेगावकर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून ग्रंथप्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. हे ग्रंथप्रदर्शन १४ ते २८ जानेवारी या कालावधीत वाचकांसाठी खुले राहणार असून यामध्ये विविध विषयांवरील ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व वाचकांनी या ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी बालाजी कातकडे यांनी केले आहे. या उपक्रमास तांत्रिक सहाय्यक नरेश काळे, वरिष्ठ लिपिक गंगाराम बेंद्रे, कनिष्ठ लिपिक गौरव आकरे, विनोद निभोरकर, विलास कांबळे तसेच विद्यार्थी व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाशीममध्ये आजपासून 'वऱ्हाडी जत्रा'!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

महिला स्वावलंबनाचे उद्दिष्ट समोर ठेऊन आणि स्थानिक महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणारी जिल्हास्तरीय सरस प्रदर्शनी व विक्रीचा उपक्रम दि. १६ पासुन वाशिम येथे 'वऱ्हाडी जत्रा' नावाने आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभाग तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. १६ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बस स्टँड जवळ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला बचत गटांनी उत्पादित केलेले खाद्यपदार्थ, मसाले, पापड-लोणची, हस्तकला, सजावटीच्या वस्तू, कापडी साहित्य आदींची प्रदर्शनी व विक्री होणार आहे.




**विशेष आकर्षण; फुड कोर्ट:**

या प्रदर्शनिचे विशेष आकर्षण म्हणजे तीनही दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनिमध्ये वाशिमकरांना विविध खाद्य पदर्थांची मेजवानी मिळणार आहे. यासाठी यामध्ये फुड कोर्ट नावाने स्वतंत्र दालन तयार करण्यात आले आहे. यामध्ये अस्सल वऱ्हाडी चवीने समृध्द असलेले मटण- मांडे, सळोई, वऱ्हाडी चिकन, कोंबडी-वडा, ज्वारीची व बाजरीची भाकरी, मिसळीची भाकरी, झुणका भाकर, मिरची ठेचा, वांग्याचे भरीत, हरबऱ्याची भाजी, भरड्याची भाजी, पुरण-पोळी, तीळ-गुळ पोळी, उसळ यासोबतच आणखी विविध खाद्य पदार्थाचा गावरानी मेवा असणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. १६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थितीत खासदार संजय देशमुख, खासदार अनुप धोत्रे, आमदार भावना गवळी, आमदार किरण सरनाईक, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार धीरज लिंगाडे, आमदार बाबुसिंग राठोड, आमदार अमित झनक, आमदार श्याम खोडे,

### महिला बचत गटांच्या उत्पादनांची भव्य प्रदर्शनी व विक्री

आमदार सई हडके हे उपस्थित राहणार आहेत.विशेष निमंत्रित म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक अनुज तारे यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जि. प. चे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी केले आहे.

या तीन दिवसीय वऱ्हाडी जत्रेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## मंगरूळपीर नगरपालिकेत नाही झाला विरोध...

# उपाध्यक्षपदी अनिल गावंडे अविरोध !

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळपीर नगर परिषदेत दि. १५ जानेवारी रोजी उपाध्यक्ष पदाच्या पार पडलेल्या निवडीत भारतीय जनता पार्टीचे अनिल गावंडे,तर स्वीकृत सदस्य पदाच्या निवडीत भाजपतर्फे नंदलाल पवार व तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटा तर्फे चंदूभाऊ परळीकर यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.



नगरपालिकेच्या उपाध्यक्ष पदाच्या निवडणूकित राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नसीम परवीन यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने भा ज.पाचे अनिल विठ्ठलराव गावंडे अविरोध निवडून आले आहे.

स्वीकृत सदस्य पदासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अपक्ष, आणि भाजपा गटातर्फे गटनेता गणेश खोडे यांनी नंदलाल खंडूजी पवार यांचे नाव दिले, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सलग्नित पक्षाचे गटनेता सौ किरण अशोक परळीकर यांनी चंदूभाऊ उर्फ प्रकाश काशिनाथ परळीकर यांचे नाव दिले दोन्ही पदा करिता दोनच उमेदवार असल्याने दोघांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. पिठासीन अधिकारी नगराध्यक्ष अशोक परळीकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्र. मुख्याधिकारी सतीश शेवदा, दिनेश व्यास, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सभेत प्रथम उपाध्यक्ष पदाची निवड करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ६, भाजप १०,काँग्रेस १, अपक्ष ३ एम आय एम १ उपस्थित होते. तर पार पडलेल्या निवडणुकीत उपाध्यक्ष, स्वीकृत सदस्य व

### स्वीकृत सदस्यपदी नंदलाल पवार व चंदूभाऊ परळीकर अविरोध

यांच्या नावाची घोषणा होताच आ. श्याम खोडे, व नगराध्यक्ष अशोक परळीकर, त्यांच्या समर्थकांनी गुलाल उधळून, फटाके फोडून व ढोल ताश्यावर थिरकून आपला आनंद व्यक्त केला. यावेळी भाजपा जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, वीरेंद्रसिंह ठाकूर, सुनील मालपाणी, शारीक सौदागर, ॲड. सुधीर घोडचर, सुरेश लुंगे, अभिषेक दंडे, श्रीहरी इंगोले, संदीप हरिहर, सीराज भाई, राजू जयस्वाल, रमेश रघुवंशी, अफसर भाई, जमील कुरेशी, गणेश बजाज, संगीता भोजने, रवी ठाकरे, राजकुमार गावंडे, यांच्यासह शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेडशी वनपरिक्षेत्रात अवैध वृक्षतोड जोमात,

# वनाधिकारी व वनकर्मचारी कोमात !

• सिटी न्युज ब्युरो @ मेडशी •

मालेगाव तालुक्यातील मेडशी वनपरिक्षेत्राच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून आडजात सागवानचे अवैध वृक्षतोड राजरोसपणे होत असून संबंधित विभागाची याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत आहे.किंवा संबंधित आडजात चोरांकडून, ठेकेदारांकडून चिरीमिरी घेऊन अर्थ पूर्ण संबंध जोपासले जात असल्याचे संशय आता गावातील सामान्य जनतेच्या प्रश्न मनात येत आहेत.





कारण ज्या रस्त्याने जावे त्या रस्त्याने शेतीच्या बांधावर, गावठाण हद्दीत, जंगलालगत किंवा रात्रीच्या अंधारात जंगलातील सुद्धा अवैध वृक्षतोड हे गेल्या काही दिवसांपासून धडाक्याने होत आहे.एकीकडे जगाचा वाढलेला तापमान हा संयुक्त राष्ट्र संघटनेत गाजलेला प्रश्न असताना महाराष्ट्रात व प्रामुख्याने विदर्भात महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून पाच वर्षात ३३ कोटी वृक्ष लागवडची योजना राबविल्या गेली.त्यादरम्यान मेडशी वनपरिक्षेत्रात सुद्धा लाखो वृक्ष लागवड झाली.मात्र त्यातली बहुतांश वृक्ष लागवड ही कागदपत्रे झाली असल्याचे निदर्शनास आले.व जे वृक्ष प्रत्यक्षात लावण्यात आली त्याचे ना संगोपण झाल ना त्यांना पाणी देण्यात आले.त्यामुळे काळाच्या ओघात त्यांचे सुद्धा विघटन झाले.आता जी जुनी नैसर्गिक वृक्ष परिसरात मोकळा श्वास घेत होती व प्राणवायूची निर्मिती करत होती ती सुद्धा काही पैशाच्या हव्यास्या पोटी वनविभाग कर्मचाऱ्यांकडून राजेरोसपणे कत्तलीसाठी सोडून दिली जात असून एकीकडे शासनाने वृक्ष लागवडीसाठी केलेला करोडो रुपयांचा खर्च व दुसरीकडे वृक्ष संवर्धनासाठी केल्या जात असलेले करोड रुपयांचा खर्च दोन्हीही वाया जात असून तात्काळ वरिष्ठांनी या संबंधित समस्येकडे गंभीर समस्या कडे लक्ष द्यावे.

अवैध वृक्षतोड थांबवावी अन्यथा याचे गंभीर परिणाम भविष्यात मेडशीतील नागरिकांना व वन्य प्राण्यांना भोगावे लागतील यात काही शंका नाही.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि.१६ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# शहरात मतमोजणीची प्रतीक्षा आणि उत्कंठा

## अकोला महापालिका निकालात उलथापालथ

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अकोला :** महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी युती सत्ता स्थापन करण्याकडे वाटचाल करत आहे. काही प्रभागात युतीला निर्भेळ यश मिळाले तर काही ठिकाणी संमिश्र यश मिळाले. शिवसेना शिंदे गट, शिवसेना उबाठा, वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले.

महापालिका निकालाची नागरिकांमध्ये उत्सुकता दिसली. मतमोजणी केंद्राबाहेर उत्कंठा शिगेला पोहोचली होती. सहा झोन मध्ये मतमोजणी करण्यात आली. पहिल्यांदा या पद्धतीने मतमोजणी करण्यात आली. निकाल जाहीर होताच त्यांचे समर्थक जल्लोष करीत होते. गुलालाची उधळण करण्यात येत होती. तसेच मिठाई वाटून आनंद साजरा करण्यात येत होता. आपल्या प्रभागाचा निकाल काय लागतो याकडे सर्वांचे लक्ष होते.
















## भाजप युतीचा जल्लोष अन् मतदानाप्रती कृतज्ञता

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अकोला :** भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अकोला विकास आघाडी, व महायुती ला अकोलेकरांनी दिलेला कौल विश्वास तसेच विजयी उमेदवारांच्या विजयाचा जल्लोष व अकोलेकरांचे आभार राजेश्वर नगरीची संस्कृती परंपरेला नमन करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कार्यालयासमोर आज दिनांक १६ जानेवारी शुक्रवार रोजी सायंकाळी सहा वाजता जल्लोष व आभार कार्यक्रम भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार एडवोकेट आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर अकोला महानगरपालिका निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल जयंत मसने व विजयी उमेदवारां सह सर्व भाजपा कार्यकर्ते व भाजपाचे शिलेदार त्यांच्यासह जल्लोष आभाराचा कार्यक्रम आयोजित केला आहे या कार्यक्रमाकरिता आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

भारतीय जनता पक्षाला सर्वात मोठा पक्ष म्हणून राजेश्वर नगरीने विजय केला केले व महापूर भारतीय जनता पक्ष महायुतीचा बनेल आणि राज राजेश्वर नगरीच्या आशा आकांक्षा पूर्ण करू जनतेने दिलेला कौल मान्य असल्याचे प्रतिक्रिया भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केली.

भाजपा महायुतीचा महापौर करण्यासाठी दिलेल्या जनतेने पाठिंबा यामुळे अकोलेखरांचे आभार आणि अकोलेकरांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी भाजपा लोकप्रतिनिधी काम करेल असा विश्वास खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त केला.

### मुख्यमंत्री, भाजप कार्यकर्ते विजयाचे शिल्पकार : आमदार रणधीर सावरकर

◆ राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस आणि भाजपा कार्यकर्ता हे विजयाचे शिल्पकार असल्याचे प्रतिक्रिया आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पूर्ण करणारे नेतृत्व याच्यावर विश्वास ठेवून जनता जनार्दनांनी सेवेची संधी दिली ही संधी मूलभूत सुविधा सह अकोले करांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याकडे लक्ष ठेवून भारतीय जनता पक्ष आणि महायुती काम करेल असेही आमदार सावरकर अशीही म्हणाले

भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस अकोला महाविकास आघाडी ला बहुमत दिला तसेच महायुती ही विजयी झाली हीच आनंदाची बाब असून अनेक प्रकारचे प्रचार करण्यात आल्यानंतर सुद्धा भारतीय जनता पक्षावर अकोले करांनी विश्वास व्यक्त केला त्याबद्दल अकोले करांची आभार अभिनंदन पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पक्षाने केलेले काम यावर जनतेनी शिक्कामोर करून भारतीय जनता पक्षाला अकोले करायची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल भाजपा निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी आभार व्यक्त केले. तसेच अकोला ती जनता सातत्याने भारतीय जनता पक्षावर प्रेम करत आहे त्या जनतेचा दिलेला विश्वास आणि त्यांची ताकद ही विकास करण्याला प्रेरणा देत असल्याची प्रतिक्रिया जयंत मसने यांनी व्यक्त केली

## अकोला शहरातील मतदारांचा विकासाला कौल

प्रतिनिधी १६ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीत शहरातील मतदारांनी विकासाला कौल देत स्पष्ट निकाल दिला आहे. पार पडलेल्या मतमोजणीनंतर विजयी उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत जनतेचा विश्वास पुन्हा एकदा संपादन केला. या विजयामुळे शहराच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाली असून आगामी काळात विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य आणि नागरी सुविधा या मुद्द्यांवर मतदारांनी प्राधान्य दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले. विजयी उमेदवारांनी प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK